महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
CIN-U40109MH2005SGC1536
Email : edhrdist@gmail.com
edhr_dist@mahadiscom.in

कार्यकारी संचालक (मानव संसाधन)
यांचे कार्यालय
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.
दूरध्वनि : २६४७५१२८ विस्तार: २५०८
Website : www.mahadiscom.in

क्र. का.सं. (मा.सं.)/२९८७८

दिनांक : ३१ जुलै २०१५

# परिपत्रक

**विषय : बदली होऊन कार्यमुक्त झालेल्या मात्र नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झालेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई**

सर्वसाधारण बदल्यांच्या कालावधीमध्ये बदल्यांबाबतचे आदेश पारित होऊन त्यानुसार कार्यमुक्त झालेल्या, मात्र अद्यापपर्यंत पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झालेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांविरुध्द तात्काळ शिस्तभंगाची कारवाई सुरू करणे आवश्यक आहे.

सदर कार्यवाहीचा भाग म्हणून प्रथम ज्या नियंत्रण अधिकाऱ्याच्या अधिनस्थ असे अधिकारी-कर्मचारी हजर होणे आवश्यक आहे अशा नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन पुढील ४ दिवसात हजर होण्याच्या सूचना द्याव्यात. कोणत्याही सबळ कारणाशिवाय हजर न होणाऱ्या सदर कर्मचारी व अधिकारी यांना आवश्यकतेप्रमाणे निलंबित करून त्यांचेविरुध्द कंपनीच्या नियमावलीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई सुरू करावी.

उपरोक्त कार्यवाहीस सर्वोच्च प्राधान्य द्यावे व पूर्तता अहवाल दि. १० ऑगस्ट २०१५ पूर्वी सादर करावा.

सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(नीलेश गटणे)
कार्यकारी संचालक (मा.सं.)